# महसुल शाखा
## विषय: अकृषिक परवानगी अर्जाची तपासणी सुची

१) विहीत नमुन्यातील अर्ज १ रुपयाचा कोर्ट फी स्टॅम्प लावलेला.

२) चालू वर्षाची पिक पहाणी असलेला गांव नमुना नं. ७/१२ चा उतारा व त्याच्या सात प्रति.

३) प्रश्नाधिन जमीनीचे गेल्या ५ वर्षाची पिक पहाणी दर्शविणारे ७/१२ उतारे व त्यावरील नोंदवलेले सर्व फेरफार उतारे.

४) नियोजित रेखांकन आराखड्याच्या ६ प्रति व मोजणी नकाशा.

५) अकृषिक करावयाची जमीन खरेदी केली असल्यास शेत जमीन खरेदीचे वेळी शेतकरी असलेबाबतचा पुरावा किंवा शेतजमीन खरेदी करणेसाठी सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेतली असल्यास त्या आदेशाची प्रत.

६) अर्जावर सर्व अर्जदारांच्या स्वाक्षऱ्या किंवा एकास प्राधिकृत केले असल्यास त्याचे रु. २०/- चे मुद्रांक पेपरवर घेतलेले जनरल मुखत्यारपत्र.

७) **सह कब्जेदार असल्यास बिनशेती करणेस हरकत नसलेबाबत रु.२०/-स्टँपवरील प्रतिज्ञापत्र.**

८) इतर हक्कातील बोजे कमी केले बाबत संबंधित अधिकाऱ्याचा दाखला.

९) अकृषिक करावयाचे जमीनीचे क्षेत्रास जाणे-येणे साठी कशाप्रकारची तरतुद केली आहे. या बाबतचा तपशील तसेच अन्य खातेदारांचे जमिनीतुन रस्ता उपलब्ध करुन घेणार असेल तर त्या जमिन मालकाचे २०/- रुपयाचे मुद्राक पेपरवर संमती पत्र.

१०) पिण्याच्या पाण्यासाठी काय व्यवस्था केली आहे. याबाबतचे लेखी निवेदन पुराव्यासह सादर करणे आवश्यक आहे.